Estd. 1962
'A++' Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प रि प त्र क

**२८/२०२१**

**विषय - कोव्हीड-१९ विषाणू संसर्ग साखळी तोडण्यासाठी (ब्रेक द चेन) प्रतिबंधात्मक आदेश**

**संदर्भ-** १. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक २१ एप्रिल, २०२१, दिनांक २९ एप्रिल, २०२१.

२. विद्यापीठ परिपत्रक जा. क्र. आस्थापना १०५९/ दि.२२ एप्रिल, २०२१, जा. क्र. आस्थापना १०७३/ दि.२७ एप्रिल, २०२१, व जा. क्र. आस्थापना १०९४/ दि.०५ मे, २०२१,

३. महाराष्ट्र शासन महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुर्नवसन विभाग शासन आदेश क्रमांक डीएमयू/२०२०/सीआर.९२/ डी.एम-१, दिनांक १२ मे, २०२१.

४. जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांचे आदेश जा.क्र.नैआ/कोरोना विषाणू/आरआर/२५८/२०२१ दि.१३/०५/२०२१

५. मा . शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे यांचे पत्र क्र.कारोना./२६२१/प्र.क्र. ३०/ मावि-१ /६५२५ दि. १४/०५/२०२१.

सर्व संबधिताना आदेशान्वये कळविण्यात येते की, कोविड-१९ संसर्गाचा वाढत असलेला प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने तातडीने काही उपाययोजना व सुचनांचे काटेकोर पालन करण्यासाठी उपरोक्त सदंर्भीय क्र. १ अन्वये दिलेले सर्व प्रतिबंधात्मक आदेश व स्पष्टीकरणांना दि. ०१ जून, २०२१ रोजी सकाळी ७.०० वा. पर्यंत उपरोक्त संदर्भीय क्र. ३ अन्वये मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यामध्ये अतिरिक्त निर्बंधांचा समावेश करणेत आलेला आहे. तसेच जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कोल्हापूर यांनी उपरोक्त संदर्भीय क्र. ४ अन्वये कोविड-१९ संसर्गाचा प्रार्दुभाव कमी करणे कामी कोल्हापूर जिल्हामध्ये दि.१५/०५/२०२१ ते २३/०५/२०२१ पर्यंत अत्यावश्यक बाबी वगळता कडक निर्बंध लागू केलेले आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे निर्देश निर्गमित करण्यात येत आहेत.

१. विद्यापीठ अधिविभाग व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकांनी ऑनलाईन (Online) अध्यापन व अध्ययन सुरू ठेवावे. (Work from Home) त्याबाबतचा अनुपालन अहवाल विद्यापीठ कार्यालयास कळविण्यात यावा.

२. अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभागांची (अभियांत्रिकी विभागाअंतर्गत येणारे विभाग, उद्यान विभाग, आरोग्य केंद्र, सुरक्षा विभाग, वाहन विभाग, इ.) सेवा सुरू राहतील तसेच, Online परिक्षा नियोजित वेळापत्रकानुसार सुरु राहतील. मात्र त्यांची कार्यालये १५% उपस्थिती सह सुरु राहतील.

३. इंटरनेट यंत्रणा, दुरध्वनी, मोबाईल सेवा पुरविणारे विभाग तसेच शेतीशी निगडीत कामे व मान्सून पूर्व कामे संबधित विभाग व अधिविभागामार्फत सुरू राहतील.

४. विद्यापीठ अधिविभाग /प्रशासकीय विभाग व कोल्हापूर जिल्हयामधील सर्व संलग्नित महाविद्यालयातील उपरोक्त अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग वगळता इतर सर्व विभाग दि.१५/०५/२०२१ रोजीचे रात्री १२.०० वा. ते दि.२३/०५/२०२१ रोजीचे रात्री १२.०० वा. पर्यंत बंद ठेवण्यात येत आहेत. शक्य तेथे संबधितांनी Online स्वरूपात घरी राहून (Work from Home) कार्यालयीन काम करावे.

५. विद्यापीठाशी संलग्नित असणाऱ्या सांगली व सातारा जिल्हयामधील महाविद्यालयांनी उपरोक्त संदर्भीय क्र. ३ च्या आदेशान्वये व आपल्या जिल्हा प्रशासनाच्या निर्देशानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

६. महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचेकडून वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, येथून पुढे महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासन यांचेकडून प्राप्त होणारे आदेश लागू राहतील.

**प्र. कुलसचिव**

**जा.क्र. आस्थापना/** 1111
दि. 15 MAY 2021

**प्रति,**

**माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.**

१) सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व सेवक
२) संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांचे प्राचार्य/संचालक
३) मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी, यांचे कार्यालयास.
४) इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.